लोकमत

# 'लॉरेन्स'चा विद्यापीठासोबत करार

## डिजिटल ऑप्टिकल तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने सहकार्यवृद्धी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ऑप्टिक्सच्या क्षेत्रातील आघाडीच्या सुप्रसिद्ध लॉरेन्स अँड मेयो प्रा. लि. (मुंबई) या कंपनीसमवेत मंगळवारी शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. सायबर सिक्युरिटी, ड्रोन तंत्रज्ञान आणि तत्सम आधुनिक डिजिटल ऑप्टिकल तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने सहकार्यवृद्धीसाठी हा करार करण्यात आला.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या करारावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि कंपनीच्यावतीने समूह संचालक (विपणन) डॉ. विवेक मेंडोंसा यांनी स्वाक्षरी केल्या. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, ऑप्टिक्सच्या क्षेत्रात अनेक गतिमान बदल होत आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत त्याचे ज्ञान आणि लाभ पोहोचविणे आवश्यक बनले आहे. उद्योगामध्ये सामावण्यास तयार अशी प्रशिक्षित तरुणांची फळी



लॉरेन्स अँड मेयो प्रा. लि.या कंपनीसमवेत मंगळवारी शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कंपनीच्यावतीने समूह संचालक डॉ. विवेक मेंडोंसा, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

घडविण्याच्या दृष्टीने आवश्यक शिक्षण, प्रशिक्षण व तंत्रज्ञान यांची गरज या कराराद्वारे पूर्ण होईल.

डॉ. विवेक मेंडोंसा म्हणाले, शिवाजी विद्यापीठासमवेत करारान्वयेही विद्यार्थ्यांना अत्याधुनिक अभ्यासक्रम, विशेष कोर्सेस, नवसाधनांचा परिचय करून देऊन उद्योगास पूरक मनुष्यबळ निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात येईल.

> लॉरेन्स अँड मेयो या कंपनीच्या अनुभवाचा लाभ घेऊन विद्यापीठात उद्योगकेंद्री युवक निर्माण होतील. त्यादृष्टीने विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करेल.
>
> \- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत केले. डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले.

सकाळ

# विद्यापीठ-लॉरेन्स अँड मेयोमध्ये सामंजस्य करार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २६ : ऑप्टिक्सच्या क्षेत्रातील लॉरेन्स अँड मेयो प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने शिवाजी विद्यापीठासमवेत आज सामंजस्य करार केला. सायबर सिक्युरिटी, ड्रोन तंत्रज्ञान आणि तत्सम आधुनिक डिजिटल ऑप्टिकल तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने सहकार्यवृद्धीसाठी करार करण्यात आला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवतंत्रज्ञानाचे ज्ञान, माहिती मिळणार आहे.



**कोल्हापूर : सामंजस्य कराराप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व मान्यवर.**

> विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा सामंजस्य करार महत्त्वाचा आहे. लॉरेन्स अँड मेयो या कंपनीच्या अनुभवाचा लाभ घेऊन विद्यापीठात उद्योगकेंद्री युवक निर्माण होतील. त्या दृष्टीने विद्यापीठ सर्वोतोपरी सहकार्य करेल.
>
> **-डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सामंजस्य करारावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि कंपनीच्या वतीने समूह संचालक (विपणन) डॉ. विवेक मेंडोंसा यांनी स्वाक्षरी केल्या. ऑप्टिक्सच्या क्षेत्रात अनेक गतिमान बदल होताहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत त्याचे ज्ञान आणि लाभ पोहोचविणे आवश्यक बनले आहे. उद्योगामध्ये सामावण्यास तयार अशी प्रशिक्षित तरुणांची फळी घडविण्याच्या दृष्टीने आवश्यक शिक्षण, प्रशिक्षण व तंत्रज्ञान यांची गरज या सामंजस्य कराराद्वारे पूर्ण होईल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी केले.

स्टार्ट-अप सुरू करण्यासाठी कंपनी विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देत आली आहे. शिवाजी विद्यापीठासमवेत करारान्वयेही विद्यार्थ्यांना अत्याधुनिक अभ्यासक्रम, विशेष कोर्सेस, नवसाधनांचा परिचय करून देऊन उद्योगास पूरक मनुष्यबळ निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात येईल, असे डॉ. मेंडोंसा यांनी सांगितले. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. एस.एन. सपली, इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजिस केंद्राचे समन्वयक डॉ. एस.डी. डेळेकर, संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा, डीएसटी, पुणे येथील माजी संचालक श्रीधर करंदीकर, लॉरेन्स अँड मेयो कंपनीचे श्री. पिल्लई, लिअँडर, गिरीधर उपस्थित होते. डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले. एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले.

2 7 SEP 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठाने सोपविली जबाबदारी : वेळेत निकाल लावण्यासाठी बदल

# द्वितीय वर्षाची पदवी परीक्षा महाविद्यालये घेणार

▸ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २६ : कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील पदवी अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षादेखील यावर्षीपासून महाविद्यालयांच्या पातळीवर होणार आहेत. वेळेत निकाल लावण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने या परीक्षा घेण्याची जबाबदारी महाविद्यालयांवर सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची अंमलबजावणी हिवाळी सत्रातील (ऑक्टोबर) परीक्षांपासून होणार आहे.

कोणत्याही विषयाची परीक्षा झाल्यानंतर त्याचा निकाल ३० ते ४५ दिवसांत जाहीर करणे बंधनकारक आहे. त्याबाबतच्या सूचना कुलपती कार्यालयाने विद्यापीठांना दिल्या आहेत. ते लक्षात घेऊन सर्व निकाल निर्धारित वेळेत जाहीर करण्याच्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाने वेळापत्रक निश्चिती ते मूल्यमापनाच्या पद्धतीमध्ये विविध बदलाची पाऊले टाकली आहेत. त्याचे सकारात्मक परिणाम झाले आहेत. गेल्या १० वर्षांपूर्वी विद्यापीठाने पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षांची जबाबदारी महाविद्यालयांवर सोपविली.महाविद्यालयांनी यशस्वीपणे ही जबाबदारी पेलली. त्यावर आता द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांमार्फत घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला.त्यानुसार समिती नियुक्त करून कार्यवाही करण्यात आली. नव्या बदलानुसार कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांना बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी अभ्यासक्रमांच्या प्रथम, द्वितीय वर्षाच्या एकूण १६ हजार ७५५ विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी लागणार आहे.

### विद्यापीठाचे लक्ष, मदत राहणार

■ वेळेत निकाल जाहीर व्हावेत, या उद्देशाने विद्यापीठाने पदवीच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांमार्फत घेण्याचा निर्णय घेतला आहे. यांअंतर्गत प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षा घेणे, मूल्यांकन करून त्यांचे गुण विद्यापीठाच्या संगणकप्रणालीत भरण्याची जबाबदारी महाविद्यालयांना पूर्ण करावी लागणार आहे. या प्रक्रियेवर विद्यापीठाचे लक्ष राहणार आहे. महाविद्यालयांसमोर काही अडचण निर्माण झाल्यास मदत केली जाणार असल्याचे पदवी प्रथम, द्वितीय वर्ष परीक्षा समितीच्या अध्यक्षा डॉ. मेघा गुळवणी यांनी सांगितले.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात ...

| | |
|---|---|
| ■ पदवी द्वितीय वर्ष अभ्यासक्रमांची महाविद्यालये : | २०१ |
| ■ सत्रनिहाय परीक्षांची एकूण संख्या : | ४० |
| ■ पदवी प्रथम आणि द्वीतीय वर्षाचे बी. एस्सी. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी : | २४६२२ |
| ■ बी. ए. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी : | ४१९०३ |
| ■ बी. कॉम. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी : | ३०२३० |

“ द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांनी घेण्याच्या प्रस्तावाला विद्या परिषदेने मान्यता दिली आहे. प्राचार्य संघटनेने त्याबाबत सकारात्मकता दर्शविली आहे. या परीक्षांबाबतची कार्यपद्धती, पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

**-डॉ. अजितसिंह जाधव**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

“ नव्या शैक्षणिक धोरणानुसार भविष्यात पर्यायी (ऑप्शनल) विषयांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे परीक्षा वेळापत्रक निश्चितीचे काम किचकट होणार आहे. त्यातून मार्ग काढण्यासह वेळेत निकाल लावण्याच्यादृष्टीने द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांकडे सोपविण्याची कार्यवाही उपयुक्त ठरणारी आहे. प्रथम वर्षाप्रमाणे द्वितीय वर्षाची परीक्षा घेण्याची महाविद्यालयांची तयारी आहे.

**-डॉ. व्ही. एम. पाटील**, सचिव, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटना